सीएन.आर.नं.

**MHRG**040046672022

दाखल तारीख –२४/११/२०२२

नोंद तारीख –०५/१२/२०२२

निकाल तारीख –१६/०६/२०२३

कालावधी – ०० व, ०६ म,२२ दि.

**निशाणी क्र. ११/अ**

**सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, पनवेल यांचे न्यायालयात,**

**पनवेल, जिल्हा रायगड.**

**(पिठासीन अधिकारी – ए.आर. गुन्नाल )**

**हिंदू विवाह याचिका क्र ८२२/२०२२**

अर्जदार क्र. १ व २ तर्फे वकील – ॲड. ए.पी. जगनाडे आणि योगेश पाटील.

## हिंदू विवाह कायदा, १९५५ कलम १३(ब) प्रमाणे घटस्फोटाचा अर्ज

## <u>न्यायनिर्णय</u>

## (घोषित दिनांकः १६/०६/२०२३)

अर्जदार क्र. १ यांनी पूर्वी सदरचा अर्ज हिंदू विवाह कायदा १९५५ चे कलम १३(ब) नुसार संमतीने विवाह विच्छेदन करुन मिळणेकरीता केला आहे.

१) अर्जातील कथन थोडक्यात असे की, अर्जदार यांचा विवाह दिनांक ०६/१२/२००६ रोजी चिंतामणी मंगल कार्यालय, पनवेल, ता. पनवेल, जिल्हा रायगड येथे संपन्न झाला. सदर विवाहबंधनातून त्यांना ऋजूता नावाची एक मुलगी झालेली आहे. दोघांमध्ये वाद हाऊ लागल्याने अर्जदार हे दिनांक ३१/०३/२०१९ पासून वेगवेगळे राहत आहेत. अर्जदारांच्या नातेवाईकांनी त्यांना समजावण्याचा बराच प्रयत्न केला परंतु त्यात त्यांना यश आले नाही. अखेर अर्जदारांनी संमतीने विवाह विच्छेदनाचा निर्णय घेतला आहे. अर्जदारांची मुलगी ऋजूता हिचा कायमचा ताबाकब्जा अर्जदार क्र. २ हिच्याकडे राहिल. अर्जदार क्र. २ हिने अर्जदार क्र. १ याच्याकडून रक्कम रुपये ६,००,०००/- (रुपये सहा लाख मात्र) घेवून तिचा व मुलगी ऋजूता हिचा मागील, चालु व भविष्याचा पोटगीचा हक्क कायमचा अर्जदार क्र. १ याच्या लाभात सोडला आहे. अर्जदार क्र. १ याच्या नावे असलेल्या दोन एल.आय.सी. पॉलिसी बंद करुन अर्जदार क्र. २ हिस सदर पॉलिसीमधील रक्कम मुलीकरिता काढून देण्याची

आहे, अर्जदार क्र. २ हिने भविष्यात स्वतः व मुलगी ऋजूता हिच्या वतीने अर्जदार क्र. १ याच्या ज्ञात–अज्ञात मिळकतीमध्ये हक्क सांगण्याचा नाही, असे अर्जदारांमध्ये ठरलेले आहे.

२) अर्ज दाखल केल्यानंतर अर्जदारांनी त्याचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र अनुक्रमे निशाणी क्र. ८ व ९ वर दाखल केले आहे. प्रतिज्ञापत्रानुसार त्यांनी प्रयत्न करुन देखील ते एकत्र राहू शकत नाही. त्यामुळे कोणत्याही दबावाला बळी न पडता त्यांनी स्वखुशीने विभक्त राहण्याचा निर्णय घेतला आहे.

३) अर्जदारांकडे चौकशी केली असता त्यांनी ते एकत्र राहण्यास असमर्थ आहेत असे सांगितले. अर्जदारांचे प्रतिज्ञापत्र व चौकशीअंती असे दिसुन येते की, वैचारीक मतभेदामुळे अर्जदारांना एकत्र राहणे शक्य नसल्याने त्यांनी स्वखुशीने विभक्त राहण्याचे ठरविले आहे. सबब प्रस्तुत अर्ज मंजूर होणेस पात्र असल्याने मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१) अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२) अर्जदार क्र. १ व २ यांचा दिनांक ०६/१२/२००६ रोजी झालेला विवाह आजपासून विच्छेदित झाला असे घोषित करण्यात येते.

३) येणेप्रमाणे हुकूमनामा करण्यात यावा.

४) अर्जदारांना हिंदू विवाह कायदा १९५५ कलम २३(४) अन्वये न्यायनिर्णयाची प्रत विनामुल्य देण्यात यावी.

ANIL RAMKRISHNA GUNNAL

Digitally signed by ANIL RAMKRISHNA GUNNAL
Date: 2023.06.16 17:09:10 +0530

**पनवेल.** **(ए.आर. गुन्नाल)**

**दिनांक – १६/०६/२०२३.** **सह दिवाणी न्यायाशीश,**

**व. स्तर, पनवेल.**